लोकशाही वार्ता

नागपूर, रविवार, २८ जून २०२०

# जुने ॲन्ड्राईड फोन गरीब विद्यार्थ्यांसाठी द्या

## मासूम संस्थेचे जनतेला आवाहन

**लोकशाही वार्ता / नागपूर**

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडण्यात येत आहे. परंतु, आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील अनेक विद्यार्थ्यांकडे ॲन्ड्राईड फोन, टीव्ही, लॅपटॉप अशी साधने नाहीत. अशा परिस्थितीत ते शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहू नये याकरिता नागरिकांनी त्यांचे जुने सुरू अवस्थेत असलेले ॲन्ड्राईड फोन असल्यास संस्थेकडे द्यावे. हे मोबाईल व्यवस्थित दुरुस्त करून गरजवंत विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

या मोहीमेत नागरिकांनी सहभाग आणि सहकार्य करावे, असे आवाहन मासूम या संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. संस्थेच्यावतीने पाच रात्र शाळांमध्ये शैक्षणिक प्रकल्प राबविला जातो. याकरिता अशा मोबाईलची आवश्यकता आहे. कुणाकडे असे अतिरिक्त मोबाईल असल्यास सुनीता जांगडेकर (९०९६९६२००२), रामदास (९९६७१३३००१), अमेय महाजन (९७६९३७१३८३) या क्रमांकावर संपर्क साधावा.